| वर्ष - ८ । अंक -९३ | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजचा गुलाबी रंग

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 10 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## दसऱ्यापूर्वी शिंदे सरकारची होणार

# शेवटची मंत्रिमंडळ बैठक ?

### अजित पवारांकडून स्पष्ट संकेत



। मुंबई ।महाईन्यूज

**पुढच्या आठवड्यात राज्यात आचारसंहिता लागण्याचे संकेत अजित पवारांनी दिले आहेत. अजित पवार म्हणाले, मुख्यमंत्री शिंदे यांनी परवा कॅबिनेट लावली आहे. कदाचित ही शेवटची कॅबिनेट असेल असे विधान पवारांनी केले. राज्यातील विधानसभा निवडणुकांचे बिगुल कधी वाजणार अशी उत्सुकता सगळ्याच राजकीय पक्षांना आहे. अशातच अजित पवारांनी थेट आचारसंहिता कधी लागू शकते यांचे संकेत दिले आहेत.**

अजित पवार पुढे म्हणाले राष्ट्रवादीतून बंडखोरीकरुन विकासासाठी आम्ही सत्तेत गेलो, लोकसभेला काय झालं त्यावर मला बोलायचं नाही.काही नारेटिव्ह सेट केला त्याचा जबरदस्त फटका बसला अशी कबूली अजित पवारांनी दिली. महायुतीत आणि महाविकास आघाडीत फक्त अर्धा टक्का मताचा फरक आहे. तरी आम्हाला राज्यात अनेक ठिकाणी जागांमध्ये फटका बसला. असे असले तरीही तिसऱ्यांदा मोदी प्रधानमंत्री होण गरजेचं होतं आणि तसेच झाले.

#### बोपदेव घाट प्रकरणावर अजित पवार म्हणाले...

पुण्यात वाढणाऱ्या महिला अत्याचाराविरोधात अजित पवार यांनी आज स्पष्ट प्रतिक्रिया दिली. राज्यातील बरीच अल्पवयीन मुले गुन्हेगारीकडे वळत आहेत. भयमुक्त राज्य असले पाहिजे. कुठल्याही चौकात दादागिरी नसली पाहिजे. अजित पवार म्हणाले, पोलिसांनी सांगितले होते सकाळी ६ गाड्या पाहिजेत.. मी त्यांना सहा गाड्या देतोय. जर काही आता वेड वाकडं झालं तर माझ्याशी गाठ आहे, असा दम पोलिसांना सुद्धा अजित पवार यांनी भरला. बोपदेव घाटात जो प्रकार घडला तो अत्यंत दुर्दैवी आहे. म्हणूच बोपदेव घाटात जे घडले त्या आरोपीला पकडण्यासाठी आम्ही १० लाखांचे बक्षीस ठेवले आहे.

#### महायुतीचे सरकार आणायचे!

**आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात महायुतीचे सरकार आणायचं आहे असा विश्वास अजित पवारांनी बोलून दाखवला. हरियाणा तसेच जम्मू आणि काश्मीर वरील विधानसभा निकालावर सुद्धा अजित पवारांनी भाष्य केले.**

**एक्झिट पोलवर कोण विश्वास ठेवणार नाही, कारण हरियाणात एक्झिट पोल फेल ठरले आणि वन साईड भाजपचे सरकार हरियाणा मध्ये आले आहे असे पवार म्हणाले.**

---

## ‘धंदा-पाणी’वाले नव्हे; तर ‘निष्ठावंत’ आण्णा बनसोडेंनाच संधी!

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सूचक संदेश : इच्छुकांचे वकीलपत्र घेतलेल्यांचा हिरमोड

। पिंपरी ।

महाईन्यूज ।प्रतिनिधी।

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक आणि निष्ठावंत आमदार आण्णा बनसोडे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने मतदार संघामध्ये जोरदार पकड निर्माण केली आहे. त्यासाठी अजित पवार यांच्या मध्यवर्ती ‘वॉर रुम’मधील यंत्रणा कामाला लागली आहे. त्यामुळेच बनसोडे यांच्या ‘ब्रँडिंग’मध्ये गुलाबी रंगाची छटा प्रामुख्याने दिसते.

महाविकास आघाडी आणि महायुतीच्या जागावाटपामध्ये पिंपरी विधानसभा मतदार संघ कोणाच्या वाट्याला जाणार याबाबत अद्याप एकमत झालेले नाही. मात्र, या मतदार संघातून इच्छुकांची संख्या मोठी आहे. महायुतीमध्ये भाजपा आणि आरपीआयच्या स्थानिक नेत्यांनी या मतदार संघावर दावा केला आहे. तसेच, महाविकास आघाडीतील इच्छुक असलेल्या नेत्यांकडून आण्णा बनसोडे यांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारीला ‘कात्री’ लावण्यासाठी षडयंत्र रचले जात आहे. त्यासाठी महापालिकेतील ठेकेदार, व्यापारी, व्यावसायिक यांची ‘युती’ झाली असून, त्यातून अजित पवार यांच्याकडे विशिष्ट इच्छुकांची शिष्टाई करण्यासाठी बारामती-पुणे- मुंबई अशी वारी केली जात आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून, पिंपरी राखीव विधानसभा मतदारसंघातून आमदार अण्णा बनसोडे यांना सोडून दुसरे कोणालाही उमेदवारी द्या, अशी मागणी बारामती येथे निमंत्रीत केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकित करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि युवा नेते पार्थ पवार यांच्या प्रमुख उपस्थित होते, असे सांगितले जाते.



#### इच्छुकांच्या अस्वस्थतेचे ‘हे’ आहे कारण...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. या संपूर्ण दौऱ्यामध्ये आमदार आण्णा बनसोडे त्यांच्या सोबत आणि व्यासपीठावर पहिल्या रांगेत उपमुख्यमंत्र्यांच्या शेजारी होते. किंबहुना, पिंपरी विधानसभा मतदार संघातील ‘टर्निंग पॉईंट’ असलेल्या बोपखेल पुलाचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला. बनसोडे यांच्या पुढाकाराने या पुलाचे काम पूर्ण झाले आणि आज अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण झाले. निवडणुकीच्या तोंडवर या कार्यक्रमाचे ‘पॉलिटिकल मायलेज’ आमदार बनसोडे यांना होणार आहे. किमान २० ते २५ हजार मतांचा ‘बेनिफीट’ निश्चित झाल्यामुळे आमदार बनसोडे विरोधकांची अस्वस्थता वाढली. त्यामुळे ‘ फेक नॅरेटिव्ह’द्वारे बनसोडे यांना ‘टार्गेट’ करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. विशेष म्हणजे, अजित पवार यांच्या प्रत्येक राजकीय भूमिकेत ‘सावली’ सारखे सोबत असणारे आण्णा बनसोडे यांना दोन महिन्यांपूर्वीच कामाला लागा, अशा सूचना दिल्या आहेत, असे राजकीय जाणकार सांगतात.

# शेती व्यापारी, विक्रेत्यांच्या फायद्याची?

## बँक ऑफ इंडियाच्या अहवालातील धक्कादायक माहिती

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ग्राहक भाजीपाल्यासाठी मोजत असलेल्या रक्कमेपैकी ६३ ते ६७ टक्के रक्कम घाऊक, किरकोळ व्यापाऱ्यांना मिळते, तर भाजीपाल्याचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना जेमतेम ३४ ते ३७ रक्कम मिळते, अशी धक्कादायक माहिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) एका अहवालातून समोर आली आहे.**



शेती सातत्याने तोट्यात जात आहे. उत्पादन खर्चा इतकी रक्कम मिळत नाही. हमीभाव न मिळल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांची पुढील पिढी शेती करण्यास तयार नाही, अशी ओरड सातत्याने शेतकरी आणि शेतकरी संघटना करीत असतात. आरबीआयने आपल्या अहवालात त्यावर शिक्कामोर्तबच केले आहे. आरबीआयच्या अहवालात म्हटले आहे, ग्राहक भाजीपाला खरेदी करताना जे पैसे मोजतात त्यापैकी अत्यल्प म्हणजे फक्त ३४ ते ३६ टक्के रक्कमच शेतकऱ्यांना मिळते, उर्वरित सर्व रक्कम व्यापारी आणि विक्रेत्यांच्या खिशात जाते. कांदा, बटाटा, टोमॅटो या प्रमुख भाजीपाल्याची अवस्था आणखी गंभीर आहे. ग्राहक मोजत असलेल्या रक्कमेपैकी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केवळ ३६ टक्के, टोमॅटो उत्पादकांना ३३ टक्के, बटाटा उत्पादकांना ३७ टक्के रक्कम मिळते. उर्वरित ६३ ते ६७ टक्के रक्कम घाऊक आणि किरकोळ व्यापारी, विक्रेत्यांना मिळते. फळ बागायतदारांची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. द्राक्ष उत्पादकांना फक्त ३५ टक्के, केळी उत्पादकांना ३१ टक्के आणि आंबा उत्पादकांना ४३ टक्के रक्कम मिळते.भाजीपाला आणि फळे नाशवंत असतात. टोमॅटो, द्राक्ष, स्ट्रॉबेरी, पालेभाज्या तोडणीनंतर दोन ते तीन दिवसांत ग्राहकांपर्यंत पोहोचली नाहीत तर मातीमोल होतात, ती शेतातही फार दिवस ठेवता येत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांकडे विक्री करण्याशिवाय कोणताही पर्याय राहत नाही. अशा नाशवंत पालेभाज्या, फळभाज्या आणि फळांसाठी काढणीनंतर साठवणुकीसाठी शीतगृहाची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. खासगी, सहकारी बाजार समित्यांच्या कारभारात पारदर्शकता आणली पाहिजे. बाजार समित्यांमध्ये शीतगृहाची सोय पाहिजे, जेणेकरून दर कमी असलेल्या अवस्थेत शेतकऱ्यांना मालाची साठवणूक करता येईल. प्रक्रियादार, उद्योजकांनी थेट बांधावरुन खरेदी केल्यास वाहतूक खर्चात मोठी बचत होईल. थेट शेतकऱ्यांकडून खरेदीला प्रोत्साहन द्यावे. मध्यस्थांची साखळी कमी झाली तर शेतकऱ्यांना जास्तीचे पैसे मिळतील.भाजीपाला पिकांच्या तुलनेत दूध उत्पादक आणि कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांची स्थिती चांगली आहे. दुधासाठी ग्राहक मोजत असलेल्या किमतीपैकी ७० टक्के रक्कम शेतकऱ्यांना मिळते. हरभरा उत्पादकांना ७५ टक्के, मूग उत्पादकांना ७० टक्के आणि तूर उत्पादकांना ६५ टक्के रक्कम मिळते. भारत भाजीपाल्याचा जगातील दुसऱ्या क्रमाकांचा उत्पादक आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या आकडेवारीनुसार देशात टोमॅटोचे २०४ लाख टन, कांद्याचे ३०२ लाख टन आणि बटाट्याचे ६०१ लाख टन उत्पादन झाले. टोमॅटो आणि बटाट्याचा भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा उत्पादक देश ठरला आहे. कांदा उत्पादनात भारत आघाडीवर आहे. २०२२ मध्ये एकूण जागतिक उत्पादनाच्या २८.६ टक्के उत्पादन देशात झाले होते.

### भाजीपाल्याची अवस्था गंभीर

शेती सातत्याने तोट्यात जात आहे. उत्पादन खर्चा इतकी रक्कम मिळत नाही. हमीभाव न मिळल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांची पुढील पिढी शेती करण्यास तयार नाही, अशी ओरड सातत्याने शेतकरी आणि शेतकरी संघटना करीत असतात. आरबीआयने आपल्या अहवालात त्यावर शिक्कामोर्तबच केले आहे. आरबीआयच्या अहवालात म्हटले आहे, ग्राहक भाजीपाला खरेदी करताना जे पैसे मोजतात त्यापैकी अत्यल्प म्हणजे फक्त ३४ ते ३६ टक्के रक्कमच शेतकऱ्यांना मिळते, उर्वरित सर्व रक्कम व्यापारी आणि विक्रेत्यांच्या खिशात जाते. कांदा, बटाटा, टोमॅटो या प्रमुख भाजीपाल्याची अवस्था आणखी गंभीर आहे.

# सत्यशील शेरकर शरद पवार पक्षाचे उमेदवार ?

## निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याचा शेरकरांचा दावा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जुन्नरचे काँग्रेसचे नेते, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक सत्यशील शेरकर हे राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे जुन्नरचे उमेदवार असण्याची शक्यता आहे.**



राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून त्यांनी इच्छुक म्हणून मुलाखत दिली असून कोणत्याही चिन्हावर निवडणूक लढविण्यास तयार असल्याचा दावा शेरकर यांनी केला. त्यामुळे जुन्नरची लढत राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे विद्यमान आमदार अतुल बेनके विरोधात सत्यशील शेरकर अशी होण्याची शक्यता आहे. जुन्नर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी ताकद आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर विद्यमान आमदार अतुल बेनके यांनी अजित पवार यांना पाठिंबा दिला होता. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून बेनके शरद पवार यांच्या संपर्कात होते. त्यामुळे बेनके राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश करतील, अशी चर्चा जुन्नर तालुक्यात सुरू झाली होती. बेनके यांना पक्षात घेऊन शरद पवार अजित पवार यांना धक्का देतील, अशी शक्यताही व्यक्त होत होती. महाविकास आघाडीच्या जागा वाटपात जुन्नर मतदारसंघ राष्ट्रवादीला मिळणार आहे. त्यामुळे या मतदारसंघातील लढत शरद पवार विरोधात अजित पवार गट अशीच होणार आहे. शेरकर काँग्रेसचे नेते असून जुन्नरमधून निवडणूक लढविण्यास ते इच्छुक आहेत. त्यानुसार त्यांनी बुधवारी राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून उमेदवारीसाठी मुलाखत दिली.'महाविकास आघाडी मला संधी देईल. कोणत्याही चिन्हावर मी निवडणूक लढविण्यास तयार आहे,' असे शेरकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यामुळे शेरकर हेच राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे उमेदवार असतील, याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसात भाजप नेते हर्षवर्धन पाटील, समरजितसिंह घाटगे यांनी राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश केला होता. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे रामराजे निंबाळकरही येत्या काही दिवसात या पक्षात प्रवेश करण्याची शक्यता आहे.

### बेनके शरद पवार यांच्या संपर्कात

राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून त्यांनी इच्छुक म्हणून मुलाखत दिली असून कोणत्याही चिन्हावर निवडणूक लढविण्यास तयार असल्याचा दावा शेरकर यांनी केला. त्यामुळे जुन्नरची लढत राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे विद्यमान आमदार अतुल बेनके विरोधात सत्यशील शेरकर अशी होण्याची शक्यता आहे.जुन्नर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी ताकद आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर विद्यमान आमदार अतुल बेनके यांनी अजित पवार यांना पाठिंबा दिला होता. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून बेनके शरद पवार यांच्या संपर्कात होते. त्यामुळे बेनके राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश करतील, अशी चर्चा जुन्नर तालुक्यात सुरू झाली होती.

## चिंचवड विधानसभेतील रावेत ते वाकड भागात

# वाढणार ‘कनेक्टिव्हीटी’!

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते विविध रस्त्यांचे भूमिपूजन

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे विकासाचे ‘व्हिजन’

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या रावेत, किवळे, पुनावळे, ताथवडे आणि वाकड भागातील प्रस्तावित रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या रस्त्यांमुळे पुणे-मुंबई महामार्गालगत झपाट्याने विकसित होणाऱ्या या गावांतील ‘कनेक्टिव्हीटी’ वाढणार आहे. या रस्त्यांना गती देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.**



पिंपरी चिंचवड विधानसभा मतदार संघासह शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहरातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

चिंचवड विधानसभा मतदार संघातील मामुर्डी किवळे येथील १८ मीटर व १२ मीटर डी.पी. रस्ता, किवळे व रावेत हद्दीवरील १८ मीटर डी.पी. व इतर रस्ते, मुकाई चौक ते शिंदे पेट्रोल पंपपर्यंत डी.पी. रस्ता, प्रभाग क्रमांक २५ मधील पुनावळे येथील मुंबई-बंगळुरू हायवेपासून काटेवस्तीकडे जाणारा ३० मीटर डी.पी. रस्ता, कोयते वस्ती चौक ते जांबे गावाकडे जाणारा १८ मी. डी.पी. रस्ता, ताथवडे गावातून जीवननगरमार्गे एमटीयू कंपनीकडे जाणारा १८ मी. डी.पी. रस्ता, पुनावळे बी. आर.टी. रोडपासून पुनावळे गावठाणातून जाणारा १८ मी. रुंद डी.पी. रस्ता, गायकवाडनगरमधील १८ मी. रुंद डी.पी. रस्त्याची स्थापत्य विषयक कामे यासह वाकड येथील टिपटॉप हॉटेलपासून अटलांटा २ सोसायटीकडे जाणारा १८ मी. डी.पी. रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यासह सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावर रक्षक चौके येथे सब-वे बांधण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे.

> “ वाढते नागरीकरण आणि वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विकास आराखड्याप्रमाणे विविध रस्ते विकसित करण्यासाठी सातत्याने आम्ही पाठपुरावा करीत आहोत. रावेत, किवळे, पुनावळे, ताथवडे, वाकड भागातील विविध भागांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या कामांना आता चालना मिळाली आहे. अनेक ठिकाणी डीपी रस्ते विकसित करताना भूसंपादन हा प्रमुख अडथळा आहे. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे अनेक रस्त्यांची कामे प्रलंबित राहतात. मात्र, आगामी काळात दळणवळणाची स्थिती सुधारण्यासाठी ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करणार आहे. प्रशासनाने सदर रस्त्यांची कामे गतीने पूर्ण करावीत, अशी अपेक्षा आहे.
>
> **–शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### सोसायटीधारक, आयटीएन्सला दिलासा...

रावेत, किवळे, पुनावळे, ताथवडे, वाकड या पट्ट्यामध्ये हिंजवडी आयटी पार्कमधील आयटीएन्स मोठ्या प्रमाणात वास्तव्य करतात. पुणे-मुंबई महामार्गाच्या दोन्ही बाजुला गेल्या १० ते १५ वर्षांमध्ये लोकवस्ती प्रचंड वाढली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर आला होता. रस्त्यांच्या विकासकामांमुळे वाहतुककोंडी कमी होणार असून, रहिवाशांची सोय होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. वाकड भागातील भूमकर चौक व भुजबळ चौकामधील रस्त्याच्या बांधणीनंतर सध्या होणाऱ्या वाहतूक कोंडीस शहरवासीयांना सामोरे जावे लागणार नाही. सदर विविध रस्त्यांच्या विकास योजनांमुळे सुनियोजित पार्किंग व्यवस्था निर्माण होणार आहे. नागरिकांना आरामदायी प्रवास, दळणवळणासाठी सुसज्ज रस्ते, सुरक्षित पदपथ (पेडेस्ट्रीयन फ्रेंडली फुटपाथ) उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सोसयटीधारक, आयटीएन्सला दिलासा मिळाला आहे.

---

## तळवडेतील बायोडायर्व्हसिटी पार्कची पायाभरणी

### राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात भर घालणारा ‘बायोडायर्व्हसिटी पार्क’ (जैवविविधता उद्यान) तळवडे येथे विकसित करण्यात येत आहे. सुमारे ७० एकर जागेत होणारा हा प्रकल्पामुळे निसर्ग परिसंस्थेचा जीर्णोद्धार होणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.**



भोसरी विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी तळवडे येथे ‘बायोडायर्व्हसिटी पार्क’ विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी त्यांनी महानगरपालिका, राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. राज्य सरकारच्या ‘माझी वसुंधरा’ योजनेतून आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांचे समर्थक आणि तळवडेतील ग्रामस्थांनी प्रस्तावित जागेत कोनशीला पूजन केले आणि प्रत्यक्षात भूमिपूजन समारंभ संपन्न झाला. यावेळी गोपाळ भालेकर, शांताराम भालेकर, रमेश भालेकर, संभाजी भालेकर, दत्तात्रय नखाते, बंडू भालेकर, रामदास मोरे, अस्मिता भालेकर, वैशाली भालेकर, सुषमा पाटील, निलेश भालेकर, शरद भालेकर, सोमनाथ मेमाणे, शंकर भालेकर, प्रमोद भालेकर, अमोल भालेकर, पंकज आवटे, युवराज भालेकर, सुरज काळोखे, महेश कुडपणे, महेश भालेकर, संपत भालेकर, आदी उपस्थित होते.

### .... असे आहे बायोडायर्व्हसिटी पार्क

बायोडायव्हर्सिटी पार्कचे नियोजन सुमारे ७० एकर जागेत केले आहे. याठिकाणी देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. किंबहुना जंगल विकसित करण्यात येणार आहे. प्राणी, पक्षी अधिवास या ठिकाणी निर्माण करण्यात येणार आहे. मृदा संवर्धन, विविध थीमद्वारे वृक्षारोपण, एन्ट्रान्स गेट, बर्ड नेस्ट वॉल, पार्किंग, गोल्फ कार्ट ॲन्ड सायकल स्टेशन, ३ एन्ट्रान्स प्लाझा, ॲम्पिथिएटर, सोयुवेनिअर शॉप, वर्कशॉप, कॅपे, बटरफ्लाय गार्डन, रिपेरिअन ॲन्ड वेटलॅन्डस, ऑर्चिडट्रम, थीम पार्क- कलर्स् ॲड कोअर फॉरेस्ट, टॉयलेट ब्लॉक्स, बायो डिझास्टर, किऑक्स, स्ट्रिम क्रॉसिंग, साइनेज, साईनेज ॲन्ड ग्राफीक फॉर इकॉलॉजी अवेअरनेस, बेन्चेस, लाईटिंग- जनरल लाईटींग, पाथवेज, पिकनिक स्पॉट, रेस्टॉरंट एरिआ, ब्रिज लाईटिंग, व्हिजीबिलीटी लाईटिंग फॉर साईट, पब्लिक ॲड्रेस सिस्टीम, वेस्ट मॅनेजमेंट, साईल ॲन्ड वेस्ट वॉटर मॅनेजमेंट असा अत्याधुनिक सोयी-सुविधांचा बायोडायव्हर्सिटी पार्क पिंपरी-चिंचवडच्या सौंदर्यामध्ये भर घालणार आहे.



## भूमिका

# ‘डेरा’वाल्यांचे राजकारण जिंकत राहाते...

**‘डेरा सच्चा सौदा’चा प्रमुख गुरमित राम रहीम याला बलात्कार आणि अन्य गंभीर गुन्ह्यांसाठी झालेल्या कैदेतून नेमकी हरियाणातील मतदानाच्या दोन दिवस आधी सुट्टी मिळते, मग मतदान शांततेत होते आणि मजमोजणीच्या दिवशी दुपारपर्यंत, ‘हरियाणात सत्ताधारी भाजपलाच पुन्हा संधी’ अशा बातम्या येऊ लागतात...**

या घटनाक्रमाला निव्वळ योगायोग समजता येणार नाही, हे खरे असले तरी आमचा मुद्दा निराळा आहे. हा मुद्दा असा की, एकटादुकटा राम रहीम नव्हे तर हरियाणात गावोगाव पाळेमुळे रोवणारी ‘डेरा’ व्यवस्था राजकारणात उपयुक्त ठरते आहे. राम रहीमचा ‘डेरा सच्चा सौदा’ ही तशा प्रकारची सर्वांत मोठी संघटना आहे, कबूल. पण हरियाणातील प्रत्येक खेड्यात काही ते पोहोचलेले नाही. तिथला स्थानिक डेरा त्या गावापुरताच असतो.शिखांचेही सात डेरे किंवा बंडखोर पंथ हरियाणा व पंजाबात असले तरी, अन्य कोणत्याही ‘डेरा’चे अनुयायी हे शीख नसतात. ते ग्रंथसाहिब मानत नाहीत. डेरा कितीही लहान क्षेत्रात आणि फक्त पाचेकशे गावकऱ्यांपुरताच असला, तरी प्रत्येक डेऱ्याला एक प्रमुख असतोच. या प्रमुखाला ते परमपूज्य मानतात. किंबहुना ग्रंथाऐवजी या जिवंत प्रमुखालाच देवासमान मानणे हे डेरा संप्रदायाचे मोठे वैशिष्ट्य आहे. ‘डेरा’मुळात शिखांमधील बंडखोरीतूनच सुरू झाले असल्याचे इतिहास सांगत असला तरी हरियाणातले डेरे शिखांचे नाहीत. बहुतेक डेऱ्यांनी वंचित समाजघटकांनाही सामावून घेतल्याचा इतिहास आहे. अर्थातच, डेऱ्यांच्या इतिहासापेक्षाही आम्हाला रस होता तो त्यांच्या राजकीय-सामाजिक प्रभावाचा अभ्यास करण्यात. त्यातून असे निष्पन्न झाले की, पंचायत पातळीपासूनच राजकारणावर डेऱ्यांचा प्रभाव



दिसतो.डेरासारख्या धार्मिक किंवा पंथीय संस्था स्वाभाविकपणे केवळ धर्मविचारापुरत्या न राहाता, आपापला सामाजिक प्रभाव टिकवून ठेवण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न करतात. हा प्रभाव त्यांना देणगीदारांना आकर्षित करण्यास आणि त्यांचे कार्य टिकवून ठेवण्यास उपयोगी पडतो. प्रभाव कायम ठेवण्यासाठी त्यांचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे आध्यात्मिक मार्गदर्शनाव्यतिरिक्त शिक्षण, आरोग्य आदी सेवा देणे. पण त्यातून राज्याच्या सार्वजनिक सेवा तरतुदींवर कसा प्रभाव पाडतात हे समजून घेणे हेही आमच्या संशोधनाचे उद्दिष्ट होते. हा प्रभाव तीन कारणांमुळे वाढतो, असे आम्हाला आढळून आले.पहिले कारण म्हणजे राज्ययंत्रणेने जे काम करायला हवे होते पण केलेले नाही, ते डेरा स्वबळावर उभारतो. गावात प्राथमिक शाळा किंवा इंग्रजी शाळा नाही, उपचारकेंद्र नाही, या प्रकारच्या कामांपासून हे सुरू होते. दुसरे कारण म्हणजे सरकारी यंत्रणांना पैसा आणि मनुष्यबळ पुरवण्याची डेऱ्यांची तयारी. अशा स्वेच्छेने दिलेल्या मदतीचा मोठाचा उपयोग कोविड-काळात सरकारने करून घेतला होता. लोकांपर्यंत डेरा-स्वयंसेवक पोहोचत होते आणि त्यामुळे सरकारची क्षमता वाढत होती. तिसरे कारण यापेक्षा निराळे. ते असे की, डेरा कोणतेही समाजकार्य- विशेषत: सरकारी यंत्रणांना उपयुक्त ठरणारे कार्य- करत नसेल, तरीदेखील मोठ्या संख्येने लोक डेऱ्यात आहेत आणि दबावगट म्हणून ते काम करू शकतात, याची जाणीव स्थानिक सरपंच, ग्रामसेवक, आमदार अशा साऱ्यांनाच असते. त्यामुळे, डेरा स्वत:हून कार्य उभारत नसला तरी डेऱ्याचा दबावाने कामे होत राहातात. याशिवाय काही डेरे स्थानिक रहिवाशांना उत्पन्नाचे साधन किंवा एखादा जोडधंदा देतात, त्यातूनही प्रभाव वाढतोच. आमच्या अभ्यासातून, काहीसा चक्रावून टाकणारा एक निष्कर्षही निघाला. तो असा की, बहुतेकदा स्थानिक डेरे हे ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील कामांवर फार दबाव आणत नाहीत (तिथे गावातील विद्यमान राजकारण सुखेनैव सुरूच राहाते) पण हेच डेरे जिल्हा पातळीवर किंवा राज्य पातळीवर मात्र ‘ही कामे झाली नाहीत- ती कामे व्हायलाच हवी’ अशा मागण्यांसाठी जोरकसपणे दबाव आणतात. गावात शाळा वा प्राथमिक उपचार केंद्र उभारण्यासारख्या मागण्या राज्य सरकारकडूनच मंजूर करवून घ्याव्या लागतात, हेही यासंदर्भात खरे. पण या मागण्या डेरा करतो आहे म्हणून त्या मान्य व्हाव्यात.

## संपादकीय »

### पक्षांचा जयो झाला...

***‘आधी सत्ता आणायची आणि मग मुख्यमंत्रीपदी कोण याची चर्चा करायची’ हा धडा महाराष्ट्र, झारखंड आदी राज्यांतील पक्ष हरियाणातील पराभवातून शिकतील?***

प्रत्येक निवडणूक ही वेगळी असते आणि तरीही प्रत्येक निवडणुकीच्या निकालात काही समान धागे असतात. जम्मू-काश्मीर आणि हरियाणा विधानसभेच्या निवडणुकांच्या निकालांबाबतही हेच म्हणता येईल. या दोनही राज्यांत ‘धक्का’ हा एक समान धागा आहे आणि दोन्ही ठिकाणच्या धक्क्यांत अ-पक्षांचा वाटा नजरेत भरण्याइतका आहे. हा झाला विश्लेषणाचा भाग. पण कोणत्याही अन्य निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीचे निकालही भविष्यासाठी काही प्रमाणात सूचक ठरतात. हे भविष्य म्हणजे अर्थातच महाराष्ट्र आणि झारखंड राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका. त्यावरही या निकालाच्या अनुषंगाने भाष्य आवश्यक. तत्पूर्वी या निकालांचे विश्लेषण.यात सत्ताधाऱ्यांसाठी सुखद धक्कादायक आहे तो भाजपचा हरियाणातील विजय..

कोणत्याही भागात विजेची एकूण मागणी ही २४ तास समान नसते. संध्याकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत कमाल मागणी असते. रात्री १२ ते सकाळी ६ ती सर्वांत कमी असते. त्यानंतर ती वाढत जाते. मात्र कोळसाविद्युत प्रकल्प २४ तास चालवावेच लागतात. मागणीप्रमाणे चालू-बंद करता येत नाहीत.

# महाराष्ट्रहित पायदळी, पण कोणासाठी?

तसेच कोळशाच्या किमती वाढत जातात किंवा खरी-खोटी कारणे देऊन वाढविल्या जाऊ शकतात. त्यामुळे कोळसावीज प्रकल्पातील विजेची प्रतियुनिट किंमत कायम वाढती असते. प्रकल्पामुळे होणारे प्रदूषण तसेच मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठ्याची गरज हे घटक पर्यावरणास हानीकारक ठरतात.मात्र सौर ऊर्जा प्रकल्पाचा प्रत्यक्ष वापर हा भारतात एकूण क्षमतेच्या साधारणत: २५ टक्के, तर पवन ऊर्जा प्रकल्पाचा ३३ टक्के इतकाच असू शकतो. ही वेळ दिवसाची असल्याने त्यावेळी विजेचा पुरवठा हा मागणीपेक्षा जास्त असतो. दिवसातील सहा तास सौर ऊर्जा मागणीपेक्षा जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे ती साठविण्यासाठी बॅटरीव्यवस्थेची किंमतदेखील मोजावी लागते. मात्र सौर किंवा पवन ऊर्जा प्रकल्प एकदा स्थापित झाला की, त्याला कोणताही इंधनखर्च नसतो. एकदा त्याची किंमत ठरली की, त्यात एक नवा पैसादेखील वाढ प्रकल्पाच्या संपूर्ण



आयुष्यात म्हणजे किमान २५ वर्षांत गरजेची नसते. हे त्याचे महत्त्वाचे लाभ आहेत.महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने सौर वीज ५,००० मेगॅवॉट्स आणि औष्णिक (कोळसा) वीज १,६०० मेगॅवॉट्स, असा एकूण ६,६०० मेगावॉट्सचा संयुक्त प्रकल्प अदानी उद्योग समूहातील कंपनीला नुकताच दिला. हे कंत्राट देताना महाराष्ट्र सरकार मोदी, शहा यांच्या आदेशानुसारच कसे काम करत होते, याचा प्रशासकीय पुरावा म्हणजे निविदा काढण्याची प्रक्रिया आणि तारखा.

वीज कायदा २००३ आणि वीज नियामक आयोगाचे अधिकार याविषयीच्या कायदेशीर तरतुदीनुसार, अशा प्रकल्पाच्या कंत्राटासाठी निविदा काढताना वीज नियामक आयोगाची पूर्वसंमती घेणे, वीज वितरण कंपनीवर बंधनकारक होते. पण तरीही निविदा जाहीर करून कंपन्यांकडून प्रस्ताव मागविले १३ मार्च २०२४ रोजी आणि त्यासाठी मान्यतेचा अर्ज केला गेला १६ जून २०२४ रोजी! २५ जून रोजी त्याची तातडीची सुनावणी झाली, आणि १२ जुलै रोजी आयोगाने किंचितशी नाराजी दाखवत या निविदेला ‘पश्चातमान्यता’ दिली. त्यातही गंमत अशी की, या निविदा मागविताना सरकारला इतकी घाई होती की, केंद्राच्या ऊर्जा खात्याच्या मार्गदर्शक सूचनांपासून पूर्ण फारकत घेतली गेली आहे. कारण त्यात संयुक्त प्रकल्पाला मान्यताच नाही. या अभूतपूर्व प्रकाराचे स्पष्टीकरण देताना महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीने नियामक आयोगासमोर कबूल केले की, मे महिन्यात असणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होणार असल्याने त्यापूर्वी निविदा काढायच्या होत्या. म्हणून प्रथम आयोगाकडे अर्ज सादर केला नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाविकास आघाडीत झुंपली?

## हरियाणातील पराभवानंतर राऊतांची काँग्रेसवर टीका

। बारामती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हरियाणा विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा विजय होईल, अशी अटकळ राजकीय तज्ज्ञ आणि एग्झिट पोल्सनी वर्तवली होती. परंतु, या सर्व शक्यता खोट्या ठरवत भाजपाने अनपेक्षितपणे विजय मिळवला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपेक्षाही भाजपाने यावेळी अधिक जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. राज्यात भाजपाने ४८, काँग्रेसने ३७, लोकदलाने २ जागा जिंकल्या आहेत. तसेच तीन अपक्ष उमेदवारांनी देखील निवडणूक जिंकली आहे. या विजयानंतर काँग्रेसच्या कारभारावर टीका होत आहे.**

तसेच काँग्रेसच्या परभवाचं विश्लेषण केलं जात आहे. अशातच, काँग्रेसचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी देखील काँग्रेसच्या कारभारावर बोट ठेवलं आहे. राऊतांनी काँग्रेसबाबत केलेल्या टिप्पणीवर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीदेखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.नाना पटोले म्हणाले, “संजय राऊत काय बोलतो काय लिहितो त्याकडे आम्ही लक्ष देत नाही आणि राहिला प्रश्न हरियाणा निवडणुकीच्या निकालाचा तर त्याचा महाराष्ट्रावर कोणताही परिणाम होणार नाही. दोन्ही राज्ये वेगवेगळी आहेत. येथील परिस्थिती वेगळी आहे. हरियाणा व महाराष्ट्रातील फरक कोणाला कळत नसेल तर तो त्यांचा विषय आहे”.प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी संजय राऊत यांच्या एका वक्तव्यावर नाना पटोले यांना प्रतिक्रिया विचारली. राऊत म्हणाले होते की “जिंकलेल्या डावाचं पराभवात कसं रूपांतर करायचं हे काँग्रेसकडून शिकायला हवं”. यावर पटोले म्हणाले, “मी त्यावर फार बोलणार नाही. वेळ आल्यावर मी बोलेन”. निवडणुकांच्या निकालांबाबत पटोले यांना विचारले असता पटोले म्हणाले, “मी योग्य वेळी योग्य प्रतिक्रिया देईन. परंतु, जे होतं ते चांगल्यासाठीच होतं, असं समजून आम्ही पुढे



जात आहोत. प्रसारमाध्यमांनी महाविकास आघाडी इतकच महायुतीकडे देखील लक्ष द्यायला हवं. तिकडे जास्त धुसफूस आहे. मुख्यमंत्र्यांची तब्येत एकाएकी कशी काय खराब होते? त्याची कारणं तुम्ही शोधायला हवीत”. शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले होते, “हरियाणातील पराभव दुर्दैवी आहे. हरियाणात काँग्रेसने एकट्याने लढण्याऐवजी इंडिया आघाडी म्हणून निवडणूक लढवायला हवी होती. कदाचित वेगळे निकाल लागले असते. काँग्रेसने समाजवादी पार्टी, आम आदमी पार्टी, शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या पक्षांना आपल्याबरोबर घेऊन निवडणूक लढवायला हवी होती. या सगळ्याचा परिणाम म्हणून निश्चितच इंडिया आघाडी जिंकली असती. काँग्रेसला वाटलं की आम्ही एकतर्फी ही निवडणूक जिंकू, आम्हाला कोणाची गरज नाही. अनेक एक्झिट पोल्सही तसंच सांगत होते. तरीदेखील काँग्रेसला हा पराभव पाहावा लागतोय, हे दुर्दैवी आहे. यातून बऱ्याच गोष्टी शिकता येतील. त्यामुळे कोणीही स्वतःला मोठा भाऊ किंवा छोटा भाऊ समजू नये. तसेच लोकसभेचं यश हे इंडिया आघाडीचं यश आहे हे लक्षात घ्यावं.

काँग्रेसच्या परभवाचं विश्लेषण केलं जात आहे. अशातच, काँग्रेसचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी देखील काँग्रेसच्या कारभारावर बोट ठेवलं आहे. राऊतांनी काँग्रेसबाबत केलेल्या टिप्पणीवर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीदेखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.नाना पटोले म्हणाले, “संजय राऊत काय बोलतो काय लिहितो त्याकडे आम्ही लक्ष देत नाही आणि राहिला प्रश्न हरियाणा निवडणुकीच्या निकालाचा तर त्याचा महाराष्ट्रावर कोणताही परिणाम होणार नाही. दोन्ही राज्ये वेगवेगळी आहेत. येथील परिस्थिती वेगळी आहे. हरियाणा व महाराष्ट्रातील फरक कोणाला कळत नसेल तर तो त्यांचा विषय आहे”.प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी संजय राऊत यांच्या एका वक्तव्यावर नाना पटोले यांना प्रतिक्रिया विचारली. राऊत म्हणाले होते की “जिंकलेल्या डावाचं पराभवात कसं रूपांतर करायचं हे काँग्रेसकडून शिकायला हवंनिवडणुकांच्या निकालांबाबत पटोले यांना विचारले असता पटोले म्हणाले, “मी योग्य वेळी योग्य प्रतिक्रिया देईन. परंतु, जे होतं ते चांगल्यासाठीच होतं, असं समजून आम्ही पुढे जात आहोत. प्रसारमाध्यमांनी महाविकास आघाडी इतकच महायुतीकडे देखील लक्ष द्यायला हवं. तिकडे जास्त धुसफूस आहे. मुख्यमंत्र्यांची तब्येत एकाएकी कशी काय खराब होते?

### वेगळे निकाल लागले असते

त्याची कारणं तुम्ही शोधायला हवीत”.शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले होते, “हरियाणातील पराभव दुर्दैवी आहे. हरियाणात काँग्रेसने एकट्याने लढण्याऐवजी इंडिया आघाडी म्हणून निवडणूक लढवायला हवी होती. कदाचित वेगळे निकाल लागले असते. काँग्रेसने समाजवादी पार्टी, आम आदमी पार्टी, शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या पक्षांना आपल्याबरोबर घेऊन निवडणूक लढवायला हवी होती. या सगळ्याचा परिणाम म्हणून निश्चितच इंडिया आघाडी जिंकली असती.

# इस्लामपूरमध्ये जयंत पाटील यांचे वर्चस्व

## महायुतीत इस्लामपूरची जागा कोणाला मिळणार?

। बारामती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इस्लामपूर विधानसभा मतदारसंघ हा हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचा एक भाग आहे. २००८ मध्ये विधानसभा मतदारसंघांची फेरमांडणी झाल्यानंतर इस्लामपूर विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आला. त्याआधी हा मतदारसंघ वाळवा विधानसभा मतदारसंघ म्हणून ओळखला जात होता.**




राष्ट्रवादी काँग्रेस(शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते जयंत राजाराम पाटील हे इस्लामपूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. आधी वाळवा विधानसभा मतदारसंघ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इस्लामपूर विधानसभा मतदारसंघात मागील तीन दशकांपासून जयंत पाटील यांचे वर्चस्व आहे. २००९, २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अनुक्रमे ५४५०८, ७५१८६ आणि ७२१६९ इतक्या मताधिक्याने जयंत पाटील विधानसभेवर निवडून गेले आहेत. इस्लामपूर विधानसभा मतदारसंघ जयंत पाटील यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांचा इस्लामपूरचा गड काबीज करण्यासाठी भाजपने मोर्चेबंधणी सुरू केली आहे. मात्र गेली तीन दशके या मतदारसंघावर वर्चस्व राखणाऱ्या पाटील यांना नमवण्यासाठी पाटील विरोधकांची मोट बांधण्याचे मोठे आव्हान महायुतीसमोर आहे. शिराळा मतदारसंघात जयंत पाटील यांचे राजकीय वर्चस्व कायम राहिले आहे.

### पुढचा आमदार भाजपाचाच

या ताकदीवरच त्यांनी सांगली जिल्ह्याचे नेतृत्व मिळविण्याचा कायम प्रयत्न केला. सांगली महापालिकेतही सत्ताबदल घडवून आपली राजकीय ताकद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. घरच्या मैदानात आपल्या विश्वासू शिलेदारांवर जबाबदारी सोपवून ते राज्य पातळीवर पक्षाची प्रदेशाध्यक्षांच्या भूमिकेतून बांधणी करत आहेत.२०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत इस्लामपूरची जागा युतीतील शिवसेनेच्या वाट्याला गेल्याने शिवसेनेने गौरव नायकवडी यांना उमेदवारी दिली तर निशिकांत भोसले-पाटील हे अपक्ष मैदानात उतरले

# रतन टाटा विलक्षण माणूस होते!

## देशाने दूरदर्शी आणि दयाळू मार्गदर्शक गमावला : पंतप्रधान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उद्योगपती व टाटा सन्सचे माजी चेअरमन रतन टाटा यांचं वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती चिंताजनक होती. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना आज मुंबईतील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपाचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.**



दरम्यान, रतन टाटांच्या निधनाचं वृत्त प्रसिद्ध होताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला. “रतन टाटा एक दूरदर्शी व्यापारी नेतृत्त्व, एक दयाळू व्यक्तीमत्त्व आणि एक विलक्षण माणूस होते. त्यांनी भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित व्यावसायिक घराण्यांना स्थिर नेतृत्व दिले. त्यांचे योगदान बोर्डरूमच्या पलीकडे गेले. नम्रता, दयाळूपणा आणि आपल्या समाजाला अधिक चांगले बनविण्याच्या अतूट बांधिलकीमुळे ते लोकप्रिय ठरले. रतन टाटा यांच्या सर्वात अनोख्या पैलूंपैकी एक म्हणजे मोठी स्वप्ने पाहण्याची आवड. शिक्षण, आरोग्यसेवा, स्वच्छता, प्राणी कल्याण यासारख्या अनेक कारणांमध्ये ते आघाडीवर होते. रतन टाटा यांच्याशी झालेल्या असंख्य संवादांनी माझे मन भरून आले आहे. मी मुख्यमंत्री असताना त्यांना गुजरातमध्ये वारंवार भेटत असे. आम्ही विविध मुद्द्यांवर विचार विनिमय करत असू. मला त्यांचा दृष्टीकोन खूप समृद्ध वाटला. मी दिल्लीत आलो तेव्हाही हे संवाद सुरूच होते. त्यांच्या निधनाने अत्यंत दु:ख झाले आहे”, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.ज्येष्ठ नेते शरद पवारांनी देखील रतन टाटांना श्रद्धांजली वाहिली आहे. पवारांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की,“जगभरात आपल्या गौरवास्पद कामगिरीतून देशाचा लौकीक वाढवणारे टाटा समूहाचे अध्यक्ष उद्योगपती रतन टाटा यांनी जगाचा निरोप घेतला. देशावर ओढवणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवी अशा प्रत्येक संकटावर मात करण्यासाठी सदैव मदतीचा हात देणे हा रतन टाटा यांचा स्वभाव सदैव स्मरणात राहील. सामाजिक जाणीवेतून आपल्या यशाचा राजमार्ग घडवणारे व्यक्तिमत्त्व रतन टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली!”रतन टाटा यांनी त्यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतून घेतले. यानंतर त्यांनी बिशप कॉटन स्कूल, शिमला आणि रिव्हरडेल कंट्री स्कूल, न्यूयॉर्कमधून १९५५ मध्ये डिप्लोमा केला. रतन टाटा यांनी १९६१ साली टाटा समूहाची प्रसिद्ध कंपनी टाटा स्टीलमधून आपल्या करिअरची सुरुवात केली. यानंतर ते १९७५ मध्ये हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये बिझनेस मॅनेजमेंट शिकण्यासाठी गेले. त्यांनी कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमधून पदवीही मिळवली आहे. आर्थिक दृष्टिकोनातून १९९१ हे वर्ष भारतासाठी खूप महत्त्वाचे होते. देशात उदारीकरण आणि खासगीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर रतन टाटा टाटा समूहाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली या समूहाने केवळ भारतातच नव्हे तर जगभरात आपली छाप सोडली आहे.“देशाने एक गौरवशाली पुत्र गमावला आहे. रतन टाटा यांच्या निधनाचं वृत्त ऐकून मी स्तब्ध झालो आहे. रतन टाटा आणि मी आमचे तीस वर्षांपासूनचे खूप उत्तम संबंध होते. रतन टाटा यांच्या कौटुंबिक आयुष्यातही मी होतो, त्यांचा आणि माझा अनेक वर्षांचा स्नेह होता. मी त्यांची विनम्रता, त्यांचा साधेपणा सगळंच पाहिलं आहे. त्यांच्या आयुष्यात प्रामाणिकपणा आणि करुणा ही मूल्यं त्यांनी कायमच जपली.

रतन टाटा हे अनेकांसाठी प्रेरणास्रोत होते. भारतातील अग्रगण्य उद्योजकांमध्ये त्यांचं नाव घेतलं जातं. देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि रोजगार निर्मितीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं. “आपल्या कारकिर्दीत रतन टाटा यांनी अगणित लोकांचं आयुष्य बदललं.

### दयाळू मार्गदर्शक गमावला

रतन टाटा १० वर्षांचे असताना त्यांचे आई-वडिल वेगळे झाले. त्यानंतर त्यांना त्यांची आजी नवाझबाई टाटा यांनी जीन पेटिट पारसी अनाथाश्रमातून औपचारिकपणे दत्तक घेतले. रतन टाटा यांचे सावत्र भाऊ नोएल टाटा यांच्यासोबत संगोपन झाले. रतन टाटा यांनी सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील कॅम्पियन स्कूलमधून घेतले. जिथे त्यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर तो कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूलमध्ये गेला. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी 1962 मध्ये कॉर्नेल विद्यापीठातून स्ट्रक्चरल अभियांत्रिकीसह आर्किटेक्चरमध्ये बीएस पूर्ण केले. हे शिक्षण पूर्ण करून त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये प्रवेश घेतला. जिथे रतन टाटा यांनी १९७५ मध्ये प्रगत व्यवस्थापन अभ्यासक्रम पूर्ण केला.

# ईव्हीएमला दोष देणं योग्य नाही : असदुद्दीन ओवेसीं

## हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाचा दणदणीत विजय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाने दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह भाजपाने हरियाणात तिसऱ्यांदा सत्तास्थापनेच्या दिशेने पाऊल टाकलं आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत काँग्रेसचा विजय होईल, असं अनेकांना वाटत होतं. निकालापूर्वी जाहीर झालेल्या एक्झिट पोलमध्येही काँग्रेसच्या विजयाचे भाकीत वर्तवण्यात आलं होतं.**



मात्र, काँग्रेसला या निवडणुकीत दारुण पराभवाचा सामना करावा लागला. दरम्यान, या निकालानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनीही या निकालावरून काँग्रेसला लक्ष्य केलं आहे.एनआयशी बोलताना ओवेसी यांनी या निकालासंदर्भात भाष्य केलं.“हरियाणात काँग्रेसला स्वत:च्या नाकर्तेपणामुळे पराभव स्वीकारावा लागला आहे. हरियाणात असे अनेक घटक होते. जे भाजपाच्या विरोधात होते. मात्र, तरीही काँग्रेसला भाजपाला रोखण्यात अपयश आलं. जर अशा परिस्थितीतही काँग्रेस भाजपाला रोखू शकत नसेल, तर ते वेदनादायी आहे”, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.पुढे बोलताना बी टीम असल्याच्या आरोपांवरूनही त्यांनी काँग्रेसला टोला लगावला. “हरियाणात तर आमच्या पक्षाने निवडणूकही लढवली नव्हती. तरीही काँग्रेसला पराभव झाला. आता भाजपाची बी टीम नक्की कोण? याचं उत्तर काँग्रेसने द्यावं. मुळात अंतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसचा पराभव झाला आहे. मध्यप्रदेशातही अशाप्रकारे काँग्रेसचा पराभव झाला”, असे ते म्हणाले.दरम्यान, या हरियाणातील पराभवानंतर काँग्रेसने ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहेत. याबाबत विचारलं असता, “ईव्हीएमला जबाबदार धरणं सोप्प आहे. ज्यावेळी काँग्रेसचा विजय होतो. त्यावेळी ईव्हीएम चांगली असते. मात्र, पराभव होतो, तेव्हा त्यात दोष असतो. हे योग्य नाही” अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.यावेळी बोलताना त्यांनी जम्मू काश्मीरच्या निकालावरही भाष्य केलं.

### काय म्हणाले असदुद्दीन ओवेसी?

कलम ३७० रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात मतदान करत भाजपाचा पराभव केला आहे. मुळात भाजपाला ज्या मिळाल्या आहेत, त्या कशा मिळाल्या याचा विचार करणं आता धर्मनिरपेक्ष लोकांचं काम आहे”, असे ते म्हणाले.हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपने ४८ तर काँग्रेसने ३७ जागांवर विजय मिळवला आहे. याशिवाय भारतीय लोकदल पक्षाने २ तर अपक्षांना ३ जागांवर विजय मिळाला आहे. या विजयासह भाजपा आता तिसऱ्यांदा हरियाणात सरकार स्थापन करणार आहे.


# नवरात्रीचा आठवा दिवस महागौरी देवीचा!

नवरात्रीचा आठवा दिवस माँ दुर्गेची आठवी शक्ती महागौरीची पूजा केली जाते. महागौरी देवीची यथायोग्य पूजा केल्याने जीवनातील सर्व संकटे दूर होतात आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त होतो. चला जाणून घेऊया चैत्र नवरात्रीच्या आठव्या दिवशी पूजा, आरती आणि मंत्र कसे करावे.माँ दुर्गेची आठवी शक्ती महागौरीची पूजा केली जाते. नवरात्रीच्या आठव्या दिवसाच्या पूजेला विशेष महत्त्व आहे, या दिवशी कन्यापूजाही केली जाते. मातेचे काही भक्त ज्यांना पूर्ण ९ दिवस उपवास करता येत नाहीत, ते प्रतिपदा आणि अष्टमी तिथीला उपवास करतात. देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की आठव्या दिवशीची उपासना माँ दुर्गेची मूळ भावना प्रतिबिंबित करते आणि महागौरी नेहमी महादेवाच्या बरोबर राहते, म्हणून मातेचे एक नाव शिव आहे. महागौरीचे पूजन केल्याने सोमचक्र जागृत होते आणि तिच्या कृपेने प्रत्येक अशक्य कार्य पूर्ण होते. जाणून घेऊया माँ महागौरीचे रूप, नैवेद्य, आरती आणि मंत्र...

## असे माता महागौरीचे रूप आहे

» देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की माता महागौरीचे सर्व कपडे आणि दागिने पांढरे आहेत, म्हणून मातेला श्वेतांबरधारा असेही म्हणतात. त्यांच्या तपश्चर्येने त्यांना गौर वर्णाची प्राप्ती झाली होती. जन्माच्या वेळी ती आठ वर्षांची होती, त्यामुळे नवरात्रीच्या आठव्या दिवशी तिची पूजा केली जाते. त्यांच्या भक्तांसाठी ते अन्नपूर्णेचे रूप आहे. ती संपत्ती, वैभव आणि आनंद आणि शांतीची प्रमुख देवी आहे. सांसारिक रूपात त्यांचे रूप अतिशय तेजस्वी, कोमल, गोरे रंगाचे आणि शुभ्र वस्त्रे परिधान केलेले असते. देवीच्या एका हातात त्रिशूळ आणि दुसऱ्या हातात डमरू आहे. एक हात अभय आणि दुसरा हात वरमुद्रामध्ये आहे. देवी महागौरीला गाणे आणि संगीत आवडते आणि ती पांढऱ्या बैलावर स्वार होते. अष्टमीला मुलींची पूजा करण्याचीही परंपरा आहे. मात्र, काही लोक नवमीच्या दिवशी कन्येची पूजाही करतात. पण, अष्टमीच्या दिवशी कन्येची पूजा करणेही उत्तम. मुलींची संख्या 9 असल्यास उत्तम, अन्यथा पूजा दोन मुलींसोबतही करता येते. मुलींसोबत लंगुरा (बटूक भैरव) ही असावा. मुलींना घरी बोलावून त्यांचे पाय धुवून कुंकुम तिलक लावावा आणि नंतर पूजेमध्ये मुलींना हलवा, हरभरा, भाजी, पुरी इत्यादी वस्तू ठेवाव्यात आणि त्यांच्या क्षमतेनुसार दक्षिणाही द्यावी. यानंतर, संपूर्ण कुटुंबाच्या चरणांना स्पर्श करा आणि मातेचा जयजयकार करताना मुलींना निरोप द्या.





## महागौरी हे नाव कसे पडले (माँ महागौरीची कथा)

» देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की, देवी पार्वतीचा जन्म राजा हिमालयापासून झाला होता. आईला तिच्या मागील जन्माच्या घटनांची जाणीव झाली जेव्हा ती फक्त 8 वर्षांची होती. वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी माता पार्वतीने भगवान शिवाला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी तपश्चर्या सुरू केली. त्यामुळे नवरात्रीच्या अष्टमी तिथीला महागौरीची पूजा केली जाते. तपश्चर्येदरम्यान मातेने केवळ हवा पिऊन तपश्चर्या सुरू केली. माता पार्वतीने तपश्चर्येने मोठे वैभव प्राप्त केले होते, म्हणून माता पार्वतीचे नाव महागौरी पडले. तपश्चर्येमुळे माता पार्वतीचे शरीर काळे झाले होते. तेव्हा तिच्या तपश्चर्येने प्रसन्न झालेल्या भगवान शिवाने महागौरीला गंगा स्नान करण्यास सांगितले. जेव्हा माता पार्वतीने गंगेत डुबकी घेतली तेव्हा देवीचे एक रूप गडद वर्णाने प्रकट झाले, ज्याला कौशिकी म्हणून ओळखले जात असे आणि दुसरे रूप तेजस्वी चंद्रासारखे दिसले, तिला महागौरी असे म्हणतात. महागौरी आपल्या भक्तांची प्रत्येक इच्छा पूर्ण करते आणि त्यांच्या मार्गात येणारे अडथळे दूर करते. आईच्या कृपेने धन आणि धान्याची कधीच कमतरता भासत नाही.

## माँ महागौरी पूजा विधि

» नवरात्रीच्या अष्टमी तिथीचीही इतर तिथींप्रमाणे पूजा केली जाते. ज्याप्रमाणे सप्तमी तिथीला शास्त्रीय पद्धतीने मातेची पूजा केली जाते, त्याचप्रमाणे अष्टमी तिथीलाही मातेची पूजा केली जाईल. या दिवशी देशी तुपाचा दिवा लावताना आईच्या कल्याणकारी मंत्राचा जप ओम देवी महागोरियाय नमः आणि मातेला लाल चुनरी अर्पण करा. यानंतर रोळी, अक्षता, पांढरी फुले, नारळाची मिठाई इत्यादी पूजा साहित्य अर्पण करावे. अग्यारी करत असाल तर रोज चार लवंगा, बताशा, वेलची, हवन साहित्य इ. यानंतर संपूर्ण कुटुंबासह कापूर किंवा दिव्याने महागौरी आरती करा आणि मातेची स्तुती करा. यानंतर दुर्गा मंत्र, दुर्गा चालीसा, दुर्गा सप्तशती इत्यादी पठण करा आणि संध्याकाळी पूजा देखील करा.

# भारताने बांगलादेशचा उडवला धुव्वा!

## भारतीय गोलंदाजांपुढे बांगलादेशचे फलंदाज सपशेल अपयशी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात भारताने तिन्ही क्षेत्रात दमदार प्रदर्शन करत बांगलादेशचा ८६ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर मालिका २-० ने खिशात घातली. या सामन्यात अगोदर भारताने रिंकू आणि नितीश यांच्या अर्धशतकांच्या जोरावर २२१ धावांचा डोंगर उभारला. यानंतर भारतीय गोलंदाजांनी शानदार कामगिरी केल्याने बांगलादेशचा ९ बाद १३५ धावांवरच मर्यादित राहिला. यासह घरच्या मैदानावर सलग सातवी मालिका जिंकली.**




बांगलादेशकडून महमुदुल्लाहने सर्वाधिक धावा केल्या, तो ३९ चेंडूंत तीन षटकारांच्या मदतीने ४१ धावा करून बाद झाला. भारताकडून नितीश रेड्डीने बॅट आणि बॉलने चांगली कामगिरी करत दोन विकेट्स घेतल्या. त्याचवेळी गेल्या सामन्यात छाप पाडणारा फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीनेही दोन विकेट्स घेतल्या. विशेष म्हणजे भारताच्या प्रत्येक गोलंदाजाला एक विकेट मिळाली. नितीश आणि वरुणशिवाय अर्शदीप सिंग, वॉशिंग्टन सुंदर, अभिषेक शर्मा, मयंक यादव आणि रियान पराग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशची फलंदाजी अत्यंत खराब राहिली. महमुदुल्लाह वगळता अन्य कोणताही फलंदाज प्रभाव पाडू शकला नाही. बांगलादेशने नियमितपणे विकेट गमावल्या आणि त्यांचे फलंदाज भागीदारी करु शकले नाहीत, ज्यामुळे त्याचे मोठे नुकसान झाले. नितीश रेड्डी, भारतासाठी आपला दुसरा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळत असताना, त्याने अष्टपैलू कामगिरी केली आणि चेंडू तसेच बॅटने महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे भारताने बांगलादेशविरुद्ध टी-२० मध्ये आपले वर्चस्व कायम राखले आहे. आता या दोन्ही संघांमधील या मालिकेतील अंतिम सामना १२ ऑक्टोबरला हैदराबादमध्ये खेळवला जाणार आहे.

बांगलादेशने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला, पण भारताने वेगवान सुरुवात केली. मात्र बांगलादेशच्या गोलंदाजांनी पॉवरप्लेमध्येच भारताला तीन धक्के देत संघाला अडचणीत आणले. सुरुवातीच्या धक्क्यानंतर संघाला सावरत नितीश आणि रिंकूने आक्रमक फलंदाजी केली आणि चौथ्या विकेटसाठी १०८ धावांची भागीदारी केली. यादरम्यान नितीशने आपला दुसरा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळताना कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावले.अर्धशतकानंतरही नितीशने आपली आक्रमक फलंदाजी थांबवली नाही आणि मोठे फटके खेळणे सुरूच ठेवले. मात्र, तो ३४ चेंडूंत चार चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ७४ धावा करून बाद झाला. नितीश बाद झाल्यानंतर रिंकू सिंगनेही अर्धशतक झळकावले, मात्र तो २९ चेंडूंत पाच चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ५३ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. हार्दिक पंड्याने काही मोठे फटके खेळले आणि भारताची धावसंख्या २०० धावांच्या पुढे नेली, पण भारतीय संघाने शेवटच्या षटकात तीन विकेट्स गमावल्या. हार्दिक १९ चेंडूंत २ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ३२ धावा करून बाद झाला. बांगलादेशकडून रिशाद हुसेनने तीन तर तस्किन अहमद, तन्झिम हसन शाकिब आणि मुस्तफिजुर रहमानने प्रत्येकी दोन गडी बाद केले. बांगलादेशकडून महमुदुल्लाहने सर्वाधिक धावा केल्या, तो ३९ चेंडूंत तीन षटकारांच्या मदतीने ४१ धावा करून बाद झाला. भारताकडून नितीश रेड्डीने बॅट आणि बॉलने चांगली कामगिरी करत दोन विकेट्स घेतल्या. त्याचवेळी गेल्या सामन्यात छाप पाडणारा फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीनेही दोन विकेट्स घेतल्या. विशेष म्हणजे भारताच्या प्रत्येक गोलंदाजाला एक विकेट मिळाली. नितीश आणि वरुणशिवाय अर्शदीप सिंग, वॉशिंग्टन सुंदर, अभिषेक शर्मा, मयंक यादव आणि रियान पराग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशची फलंदाजी अत्यंत खराब राहिली. महमुदुल्लाह वगळता अन्य कोणताही फलंदाज प्रभाव पाडू शकला नाही. बांगलादेशने नियमितपणे विकेट गमावल्या आणि त्यांचे फलंदाज भागीदारी करु शकले नाहीत, ज्यामुळे त्याचे मोठे नुकसान झाले.त्याने अष्टपैलू कामगिरी केली आणि चेंडू तसेच बॅटने महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे भारताने बांगलादेशविरुद्ध टी-२० मध्ये आपले वर्चस्व कायम राखले.

### रिंकू-नितीशने जिंकली मनं

आहे. आता या दोन्ही संघांमधील या मालिकेतील अंतिम सामना १२ ऑक्टोबरला हैदराबादमध्ये खेळवला जाणार आहे.बांगलादेशने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला, पण भारताने वेगवान सुरुवात केली. मात्र बांगलादेशच्या गोलंदाजांनी पॉवरप्लेमध्येच भारताला तीन धक्के देत संघाला अडचणीत आणले. सुरुवातीच्या धक्क्यानंतर संघाला सावरत नितीश आणि रिंकूने आक्रमक फलंदाजी केली आणि चौथ्या विकेटसाठी १०८ धावांची भागीदारी केली. यादरम्यान नितीशने आपला दुसरा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळताना कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावले.

# श्रीलंका १०० धावांच्या आत ऑल आऊट

## भारताला उपांत्य फेरी गाठायची असेल तर मोठा विजयाची आवश्यकता

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये भारताने श्रीलंकेचा ८२ धावांनी मोठा पराभव करत टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठा विजय नोंदवला आहे. भारताने श्रीलंकेच्या गोलंदाजांची धुलाई करत १७३ धावांचे मोठे लक्ष्य दिले आणि त्यानंतर गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातही उत्कृष्ट कामगिरी करत आवश्यक अशा या मोठ्या विजयाची नोंद केली.**




भारताला टी-२० विश्वचषक २०२४ च्या उपांत्य फेरीच्या शर्यतीत टिकून राहायचे असेल तर त्यांना एका मोठ्या विजयाची गरज होती आणि भारताने श्रीलंकेविरूद्ध हा मोठा विजय नोंदवला आहे. या विजयासह भारताने अ गटातील गुणतालिकेत न्यूझीलंडला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले आहे. आशा शोभनाने आठव्या षटकात विकेटच्या अनेक संधी निर्माण केल्या आणि अखेरीस शेवटच्या चेंडूवर तिला यश मिळाले. आशा गोलंदाजी करत फलंदाजाला पुढे येऊन खेळण्यासाठी प्रवृत्त केले पण अनुष्का संजीवनी चेंडू टाईम करू शकली नाही आणि तो थेट रिचाच्या ग्लोव्हजमध्ये गेला आणि रिचाने चपळाईने अनुष्काला स्टंपिंग करत बाद केले. श्रीलंकाने ८ षटकांत ४ बाद ३४ धावा केल्या आहेत.अरूंधती रेड्डीच्या १२व्या षटकात श्रीलंकेने २ विकेट्स गमावले आहेत. अरूंधतीने दुसऱ्या चेंडूवर निलाक्षीला शफाली वर्मीकरवी झेलबाद केले. तर अखेरच्या चेंडूवर रेणुकाने उत्कृष्ट झेल घेत दिल्हारीला झेलबाद केले. अजून एक विकेट मिळवून दिली आहे. आशा शोभनाच्या गुगलीवर सुगंधिका कुमारीला रिचा घोष कमाल झेल टिपत बाद केले. श्रीलंकेने रिव्ह्यू घेतला पण निकाल भारताच्या बाजूने गेला.

### श्रीलंकेला मोठे 3 धक्के दिले

यासह श्रीलंकेने १३ षटकांत ७ बाद ६१ धावा केल्या आहेत. पॉवरप्लेमध्ये श्रीलंकेने ३ बाद २४ धावा केल्या आहेत. भारताने पहिल्या सलग ३ षटकांत ३ विकेट घेत श्रीलंकेला मोठे ३ धक्के दिले. गुणरत्ने, कर्णधार चमारी आणि हर्षिता माधवी बाद झाले आहेतभारताला दुसऱ्याच षटकात मोठी विकेट मिळाली आहे. श्रेयंका पाटीलने दुसऱ्या षटकातील पाचव्या चेंडूवर श्रीलंकेची कर्णधार चमारीला बाद करत भारताच्या खात्यात मोठी विकेट मिळवून दिली आहे.